**नि.फौ.ख.क्र.१६१/२०२०**
**सरकार वि. धर्मराज**
**नि.क्र.२६**

साक्षीदार क्र ०४ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–राजु बबन भजभुजे.
वय २८ वर्ष, व्यवसाय–दुकाण.
राह.रामटेक नगरधन, तह.रामटेक, जि.नागपुर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत**

१. पोलिसांनी मला दि.०३/०९/२०२० रोजी कोठेही बोलविले नाही. माझ्यासमक्ष कोणतीही कारवाई केली नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नव्हता सहीपुरता **निशानी क्र.२७** देण्यात आला. पोलिसांनी माझे फोटो काढले होते त्यात माझा फोटो आहे त्याला **आर्टीकल ब** देण्यात आले.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे मला माहित नाही की, दि.०३/०९/२०२० रोजी पोलिसांनी मला आउटपोस्ट सिर्सी येथे बोलाविले होते व माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक वेळवाची काठी लोखंडी पाते लागलेली जप्त केली होती व सदर जप्तीपंचनामा माझ्यासमक्ष तयार केला मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. दिलीप कांबडी हे तेथे हजर होते. हे मला माहीत नाही की, त्यांनी त्यावेळी सही केली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.आर.बी.भोबे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि २५.०२.२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड